# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** मौजा – परसोडी, खसरा क्र. 127/3, 124/4 पार्ट, आरक्षण क्र.
**{नगर रचना विभाग}** MSW – 24 अग्निशमन केंद्र एकुण आराजी 4960.748 चौ.मी. पैकी 2000.00 चौ.मी. जागा संपादन करण्याबाबत.

नागपूर शहराची सुधारित विकास योजना शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस–2496/2643/प्र.क्र. 300(अ) / 97/ नवि–9, दि. 07.01.2000 अन्वये भागशः मंजुर झालेली असुन व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस–2400/1628/प्र. क्र200/2000/नवि–9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झालेली असुन ती अनुक्रमे दि. 01.03.2000 व पुर्नप्रसिध्द विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस–2400/1628/प्र.क्र.200/2000 /नवि–9, दि. 10.09.2001 रोजी मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि. 21.09.2001 पासुन अंमलात आलेली आहे. तसेच शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस–2401/855/प्र.क्र.76/नवि–9, दि. 27.02.2002 सात योजनेकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषित केलेले होते. तथापि, शासनकाडील निर्णय क्र. टिपीएस–2419/1419/प्र.क्र.154/नवि–9, दि. 27.08.2019 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रातील 7 योजनेकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषित केलेले आहे. शासन निर्णय क्र. टिपीएस–2419/1419/प्र.क्र. भाग–1/2019/नवि–9, दि. 09.04. 2021 नुसार स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील भाग वगळता 7 योजनेकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषित केले असुन विषयांकित जागेकरीता महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. तसेच सदर जागा राखीव असुन उक्त आरक्षणाकरीता समुचित प्राधिकरण नागपूर महानगरपालिका आहे.

अर्जदार रियरटेक प्रा. लि. तर्फे संचालक श्री. अनिल दिवाकरण नायर यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम–127 अंतर्गत मौजा–परसोडी, खसरा क्र. 127/3, 124/4(P) येथील 0.624 हेक्टर जागेवरील आरक्षण क्र. MSW-24 (Fire Station) करीता राखीव जागेकरीता दि. 06.09.2023 रोजी महानगरपालिकेस खरेदी सूचना बजावलेली आहे. नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजा–परसोडी, खसरा क्र. 127/3, 124/4(P) येथील 0.624 हेक्टर क्षेत्राची जागा आरक्षण क्र. MSW-24 (Fire Station) करीता राखीव असुन उक्त आरक्षणाकरीता समुचित प्राधिकरण नागपूर महानगरपालिका, नागपूर आहे. तसेच

सदर जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. अर्जदाराने बजावलेल्या खरेदी सुचनेच्या अनुषंगाने नगर रचना विभागाने विषयांकीत जागेचे स्वसाक्षांकीत खरेदी पत्र, 7/12 उताऱ्याची अद्यावत सत्य प्रत, नगर भुमापन विभागाची मोजणी 'क' प्रत व अद्यावत मालमत्ता पत्रकाची सत्यप्रत, विकास योजना नकाशात आरक्षणाने बाधीत जागा दर्शविलेला भाग नकाशा, आरक्षणाने बाधीत जागेचे क्षेत्रफळासह नकाशा इत्यादी दस्तावेज अर्जदाराकडून मागविले असता, अर्जदाराने वरीलप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रानूसार अर्जदाराने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम–127 अन्वये खरेदी सूचना दिल्याने, त्यानुषंगाने उक्त जागेचे संपादनाची कार्यवाही महानगरपालिकेद्वारे करणे अपेक्षित असल्याने, उक्त आरक्षणाने बाधीत क्षेत्राच्या मोबदल्यात अर्जदारास हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) महानगरपालिका, नागपूर देण्यास तयार असल्याचे अर्जदारास कळविण्यात आलेले होते. त्यानुसार अर्जदाराने उपरोक्त जागेचा हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) घेण्यास नकार देवून सदर जागा खरेदी करणे अथवा भूमी संपादन, पुनवर्सन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम–2013 अन्वये कार्यवाही करण्याबाबत कळविलेले आहे.

उक्त प्रकरणात नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेत मौजा–परसोडी येथील खसरा क्र. 127/3, 124/4(P) मधील 0.624 हेक्टर क्षेत्राची जागा MSW-24 Fire Station करीता राखीव असून, उक्त राखीव जागेकरीता नागपूर महानगरपालिका, समुचित प्राधिकरण असून, उक्त जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. त्यानूसार विषयांकीत जागेची अग्निशमन विभागाला अग्निशमन केंद्र उभारण्याकरीता आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली असता, अग्निशमन विभागाकडून सदर जागा ही अग्निशमन केंद्र उभारणीकरीता अत्यंत उपयुक्त असून सदर परिसरात मोठया प्रमाणात मॉल, सभागृह, हॉस्पीटल, शाळा / कॉलेज व उंच इमारती असून जागेवर अग्निशमन केंद्र उभारणी केल्यास खामला, सिंधी कॉलोनी, पडोळे चौक, प्रताप नगर, विद्या नगर, स्वावलंबी नगर, विद्याविहार नगर, लक्ष्मीनगर चौक, माटे चौक, श्रध्दानंदपेठ, सुरेंद्र नगर, निरी कॉलोनी, तात्या टोपे नगर, देव नगर इत्यादी परिसरातील जवळपास 3 ते 4 लक्ष नागरीकांना अग्निशमन सेवेचा लाभ होईल तसेच विभागाकडे हलके व जड असे एकुण 54 विविध प्रकारचे वाहनांद्वारे दैनंदिन सेवा पुरविण्यात येत असून, सदर वाहनांच्या देखभाल व दुरूस्ती करीता अग्निशमन विभागाचे स्वतंत्र केंद्रीय वर्कशॉप कम गॅरेज साठी सुध्दा जागेचा वापर करण्यास उपयोग होवू शकेल, असा अहवाल प्राप्त झाला असल्याने अग्निशमन विभागाला सदर जागेची आवश्यकता आहे.

अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता, मौजा–परसोडी, खसरा क्र. 127/3, 124/4(P) मधील एकुण MSW-24 (Fire Station) जागेचे क्षेत्रफळ 0.624 हेक्टर म्हणजेच 6240.00 चौ.मी. इतकी असून, त्यापैकी अर्जदाराची एकुण जागा 4960.748 चौ.मी. इतकी बाधीत होत असून उर्वरीत उत्तरेकडील भागातील जमिनीवर रहिवास विकास झाल्याचे दिसून येते.

अग्निशमन विभाग, महानगरपालिका नागपूर दि. 05.09.2024 रोजीच्या पत्रानुसार अग्निशमन केंद्र उभारणीकरीता एकुण आरक्षित जागेपैकी 2000.00 चौ.मी. जागेच्या आवश्यकतेबाबत कळविलेले आहे. त्याअनुषंगाने अर्जदारास वरील राखीव जागेपैकी 2000.00 चौ. मी क्षेत्राचा TDR नागपूर महानगरपालिका देण्यास तयार असल्याबाबत अर्जदारास दि. 13.12. 2024 रोजी पुन्हा कळविले असता, आजतागायत अर्जदाराने त्याबाबत काहीही कळविलेले नाही.

यामुळे अर्जदाराने कलम–127 अंतर्गत बजावलेल्या खरेदी सूचनेच्या अनुषंगाने राखीव जागा दोन वर्षाच्या कालमर्यादेत संपादन करणे आवश्यक असल्यामुळे, त्याबाबतची मुदत दि. 05. 09.2025 पर्यंतची आहे. सदर जागेचे भूसंपादन हे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 126 व भूमी संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम 2013 अंतर्गत भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे विहीत कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. याकरीता भूसंपादन अधिनियमानूसार विहीत कालमर्यादेत कलम – 19 ची सुचना प्रसिध्द होणे अनिवार्य आहे. अन्यथा कलम 126 अंतर्गत भूसंपादन प्रक्रिया दोन वर्षाचे आत न झाल्यास वरील आरक्षण मंजूर विकास योजनेतून व्यपगत होवून आजुबाजुला झालेल्या विकासाच्या अनूषंगाने अर्जदारास विकासासाठी मुक्त होईल. तेव्हा वरील आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर आरक्षित जागेचे एकुण क्षेत्र 0.624 हे. एवढे असले तरी त्या भागात अग्निशमन केंद्राकरीता राखीव जागेपैकी अग्निशमन विभागास आवश्यक असलेले 2000.00 चौ.मी. क्षेत्राची जागा संपादन करणे उचित होईल.

सदर जागेचा सन 2024 च्या बाजारमुल्य दर तक्त्यातील दर रू. 46,400 /- प्रती चौ.मी. एवढा आहे. त्यानूसार संपादनाखालील जागेचे 2000.00 चौ.मी. क्षेत्र विचारात घेता सदर जागेचे मुल्यनिर्धारण खालीलप्रमाणे आहे.

संपादित करावयाचे क्षेत्र – 2000.00 चौ.मी. X 46400/– प्रती.चौ.मी. X 2 = 18,56,00,000/–

सदर जागेचे संपादनाकरीता सुमारे रू. 18.56 करोड इतका खर्च अपेक्षित आहे. सदर भूसंपादनाकरीता लागणारा खर्च महानगरपालिका फंडातून करणे आवश्यक आहे. सदर जागेचे स्थानमान हिंगणा रिंग रोडलगत असून, अग्निशमन विभागास जागेची आवश्यकता विचारात घेता सदर राखीव जागेपैकी 2000.00 चौ.मी. क्षेत्राच्या जागेचा भूसंपादन प्रस्ताव भूमीसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम 2013 अंतर्गत मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर भुसंपादनाकरीता लागणारा आवश्यक निधी नागपूर महानगरपालिकेच्या फंडातुन खर्च करणेबाबत व सदर अग्निशमन केंद्राची आरक्षित जागा संपादनाकरीता अपेक्षित अंदाजित खर्चाच्या मान्यतेसह भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे सादर करणेचा प्रश्न विचारात घेणे.

(सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.)

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 127/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 12/02/2025**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मौजा – परसोडी, खसरा क्र. 127/3, 124/4 पार्ट, आरक्षण क्र. MSW – 24 अग्निशमन केंद्र एकुण आराजी 4960.748 चौ.मी. पैकी 2000.00 चौ.मी. जागा संपादन करण्याबाबत.

नागपूर शहराची सुधारित विकास योजना शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस–2496/2643/प्र.क्र. 300(अ) / 97/ नवि–9, दि. 07.01.2000 अन्वये भागशः मंजुर झालेली असुन व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस–2400/1628/प्र. क्र200/2000/नवि–9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झालेली असुन ती अनुक्रमे दि. 01.03.2000 व पुर्नप्रसिध्द विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस–2400/1628/प्र.क्र.200/2000 /नवि–9, दि. 10.09.2001 रोजी मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि. 21.09.2001 पासुन अंमलात आलेली आहे. तसेच शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस–2401/855/प्र.क्र.76/नवि–9, दि. 27. 02.2002 सात योजनेकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषित केलेले होते. तथापि, शासनकाडील निर्णय क्र. टिपीएस–2419/1419/प्र.क्र.154/नवि–9, दि. 27.08.2019

अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रातील 7 योजनेकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषित केलेले आहे. शासन निर्णय क्र. टिपीएस–2419/1419/प्र.क्र. भाग–1/2019/नवि–9, दि. 09.04.2021 नुसार स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील भाग वगळता 7 योजनेकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषित केले असुन विषयांकित जागेकरीता महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. तसेच सदर जागा राखीव असुन उक्त आरक्षणाकरीता समुचित प्राधिकरण नागपूर महानगरपालिका आहे.

अर्जदार रियरटेक प्रा. लि. तर्फे संचालक श्री. अनिल दिवाकरण नायर यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम–127 अंतर्गत मौजा–परसोडी, खसरा क्र. 127/3, 124/4(P) येथील 0.624 हेक्टर जागेवरील आरक्षण क्र. MSW-24 (Fire Station) करीता राखीव जागेकरीता दि. 06.09.2023 रोजी महानगरपालिकेस खरेदी सूचना बजावलेली आहे. नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजा–परसोडी, खसरा क्र. 127/3, 124/4(P) येथील 0.624 हेक्टर क्षेत्राची जागा आरक्षण क्र. MSW-24 (Fire Station) करीता राखीव असुन उक्त आरक्षणाकरीता समुचित प्राधिकरण नागपूर महानगरपालिका, नागपूर आहे. तसेच सदर जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. अर्जदाराने बजावलेल्या खरेदी सुचनेच्या अनुषंगाने नगर रचना विभागाने विषयांकीत जागेचे स्वसाक्षांकीत खरेदी पत्र, 7/12 उताऱ्याची अद्यावत सत्य प्रत, नगर भुमापन विभागाची मोजणी 'क' प्रत व अद्यावत मालमत्ता पत्रकाची सत्यप्रत, विकास योजना नकाशात आरक्षणाने बाधीत जागा दर्शविलेला भाग नकाशा, आरक्षणाने बाधीत जागेचे क्षेत्रफळासह नकाशा इत्यादी दस्तावेज अर्जदाराकडून मागविले असता, अर्जदाराने वरीलप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रानूसार अर्जदाराने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम–127 अन्वये खरेदी सूचना दिल्याने, त्यानुषंगाने उक्त जागेचे संपादनाची कार्यवाही महानगरपालिकेद्वारे करणे अपेक्षित असल्याने, उक्त आरक्षणाने बाधीत क्षेत्राच्या मोबदल्यात अर्जदारास हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) महानगरपालिका, नागपूर देण्यास तयार असल्याचे अर्जदारास कळविण्यात आलेले होते. त्यानुसार अर्जदाराने उपरोक्त जागेचा हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) घेण्यास नकार देवून सदर जागा खरेदी करणे अथवा भूमी संपादन, पुनवर्सन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम–2013 अन्वये कार्यवाही करण्याबाबत कळविलेले आहे.

उक्त प्रकरणात नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेत मौजा–परसोडी येथील खसरा क्र. 127/3, 124/4(P) मधील 0.624 हेक्टर क्षेत्राची जागा MSW-24 Fire Station करीता राखीव

असून, उक्त राखीव जागेकरीता नागपूर महानगरपालिका, समुचित प्राधिकरण असून, उक्त जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. त्यानूसार विषयांकीत जागेची अग्निशमन विभागाला अग्निशमन केंद्र उभारण्याकरीता आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली असता, अग्निशमन विभागाकडून सदर जागा ही अग्निशमन केंद्र उभारणीकरीता अत्यंत उपयुक्त असून सदर परिसरात मोठया प्रमाणात मॉल, सभागृह, हॉस्पीटल, शाळा / कॉलेज व उंच इमारती असून जागेवर अग्निशमन केंद्र उभारणी केल्यास खामला, सिंधी कॉलोनी, पडोळे चौक, प्रताप नगर, विद्या नगर, स्वावलंबी नगर, विद्याविहार नगर, लक्ष्मीनगर चौक, माटे चौक, श्रध्दानंदपेठ, सुरेंद्र नगर, निरी कॉलोनी, तात्या टोपे नगर, देव नगर इत्यादी परिसरातील जवळपास 3 ते 4 लक्ष नागरीकांना अग्निशमन सेवेचा लाभ होईल तसेच विभागाकडे हलके व जड असे एकुण 54 विविध प्रकारचे वाहनांद्वारे दैनंदिन सेवा पुरविण्यात येत असून, सदर वाहनांच्या देखभाल व दुरूस्ती करीता अग्निशमन विभागाचे स्वतंत्र केंद्रीय वर्कशॉप कम गॅरेज साठी सुध्दा जागेचा वापर करण्यास उपयोग होवू शकेल, असा अहवाल प्राप्त झाला असल्याने अग्निशमन विभागाला सदर जागेची आवश्यकता आहे.

अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता, मौजा—परसोडी, खसरा क्र. 127/3, 124/4(P) मधील एकुण MSW-24 (Fire Station) जागेचे क्षेत्रफळ 0.624 हेक्टर म्हणजेच 6240.00 चौ.मी. इतकी असून, त्यापैकी अर्जदाराची एकुण जागा 4960.748 चौ.मी. इतकी बाधीत होत असून उर्वरीत उत्तरेकडील भागातील जमिनीवर रहिवास विकास झाल्याचे दिसून येते.

अग्निशमन विभाग, महानगरपालिका नागपूर दि. 05.09.2024 रोजीच्या पत्रानुसार अग्निशमन केंद्र उभारणीकरीता एकुण आरक्षित जागेपैकी 2000.00 चौ.मी. जागेच्या आवश्यकतेबाबत कळविलेले आहे. त्याअनुषंगाने अर्जदारास वरील राखीव जागेपैकी 2000.00 चौ. मी क्षेत्राचा TDR नागपूर महानगरपालिका देण्यास तयार असल्याबाबत अर्जदारास दि. 13.12. 2024 रोजी पुन्हा कळविले असता, आजतागायत अर्जदाराने त्याबाबत काहीही कळविलेले नाही.

यामुळे अर्जदाराने कलम—127 अंतर्गत बजावलेल्या खरेदी सूचनेच्या अनुषंगाने राखीव जागा दोन वर्षाच्या कालमर्यादेत संपादन करणे आवश्यक असल्यामुळे, त्याबाबतची मुदत दि. 05. 09.2025 पर्यंतची आहे. सदर जागेचे भूसंपादन हे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 126 व भूमी संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम 2013 अंतर्गत भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे विहीत कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. याकरीता भूसंपादन अधिनियमानूसार विहीत कालमर्यादेत कलम — 19 ची सुचना प्रसिध्द होणे अनिवार्य आहे. अन्यथा कलम 126 अंतर्गत

भूसंपादन प्रक्रिया दोन वर्षाचे आत न झाल्यास वरील आरक्षण मंजूर विकास योजनेतून व्यपगत होवून आजुबाजुला झालेल्या विकासाच्या अनूषंगाने अर्जदारास विकासासाठी मुक्त होईल. तेव्हा वरील आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर आरक्षित जागेचे एकुण क्षेत्र 0.624 हे. एवढे असले तरी त्या भागात अग्निशमन केंद्राकरीता राखीव जागेपैकी अग्निशमन विभागास आवश्यक असलेले 2000.00 चौ.मी. क्षेत्राची जागा संपादन करणे उचित होईल.

सदर जागेचा सन 2024 च्या बाजारमुल्य दर तक्त्यातील दर रू. 46,400 /- प्रती चौ.मी. एवढा आहे. त्यानूसार संपादनाखालील जागेचे 2000.00 चौ.मी. क्षेत्र विचारात घेता सदर जागेचे मुल्यनिर्धारण खालीलप्रमाणे आहे.

संपादित करावयाचे क्षेत्र — 2000.00 चौ.मी. X 46400/— प्रती.चौ.मी. X 2 = 18,56,00,000/—

सदर जागेचे संपादनाकरीता सुमारे रू. 18.56 करोड इतका खर्च अपेक्षित आहे. सदर भूसंपादनाकरीता लागणारा खर्च महानगरपालिका फंडातून करणे आवश्यक आहे. सदर जागेचे स्थानमान हिंगणा रिंग रोडलगत असून, अग्निशमन विभागास जागेची आवश्यकता विचारात घेता सदर राखीव जागेपैकी 2000.00 चौ.मी. क्षेत्राच्या जागेचा भूसंपादन प्रस्ताव भूमीसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम 2013 अंतर्गत मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर भुसंपादनाकरीता लागणारा आवश्यक निधी नागपूर महानगरपालिकेच्या फंडातुन खर्च करणेबाबत व सदर अग्निशमन केंद्राची आरक्षित जागा संपादनाकरीता अपेक्षित अंदाजित खर्चाच्या मान्यतेसह भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे सादर करण्याच्या प्रस्तावास मा.प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.